संशोधन आराखडा

"सामाजिक संपर्क माध्यमांचा तरुण पिढीवरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)"

"A Sociological Study of Social Media and its Impact on Young Generation (Special Reference: Latur District)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

आकांक्षा भूषण कांबळे

एम.ए., सेट, नेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सुरेखा वैजनाथ दाडगे

एम.ए., एम.फिल, पीएच.डी.(समाजशास्त्र)

समाजशास्त्र विभागप्रमुख

कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,

उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मार्च - 2022

“सामाजिक संपर्क माध्यमांचा तरुण पिढीवरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अभ्यास” (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

प्रस्तावना (Introduction) :

21 वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जात आहे. 1990 नंतर म्हणजे जागतिकीकरणाच्या सुरूवातीला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये झालेली क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनामध्ये फार वेगाने बदल होताना आपण पाहत आणि अनुभवत आहोत. या माहिती तंत्रज्ञानातील इंटरनेटवर आधारीत असणारे संवाद माध्यमे म्हणजे सोशल मिडिया. यास सामाजिक बदलाचे साधन म्हणून पाहिले जात आहे. गेल्या काही वर्षात सोशल मिडियाची परिणामकारकता मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. इंग्लंडमधील वांशीक दंगल, अरब राष्ट्रामध्ये झालेल्या उठावापासून भारतामध्ये अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात सुरू केलेल्या आंदोलनापर्यंत अतिशय व्यापक स्वरूपात सोशल मिडिया जगापर्यंत येत आहे. प्रत्यक्ष कधीही न भेटता शेकडो लोकांना संपर्कादवारे भेटण्याची संधी देणारे हे माध्यम आहे. ते लोकांना त्यांचे विचार, भावना, चांगले वाईट अनुभव एकमेकांबरोबर शेयर करायला एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देते. ते देखील कोणाच्याही वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप न करता. सोशल मिडियाचा आणखी एक परिणाम म्हणजे अतिशय वेगाने होणाऱ्या माहितीचे दळवणळण, शब्द आणि चित्रमय स्वरूपात होणारी संदेशाची देवाणघेवाण ट्विटरवर लिहायला 20 सेकंद पुरेसे होतात. जगात कोठेही तुम्ही संपर्क करू शकता. साहजिकच तुम्ही जगाचा एक भाग बनता.

या सामाजिक संपर्क माध्यमांचा वापर करून तरुणांना क्षणार्धात जगाशी संपर्क साधता येतो. या सोशल मिडियाचा वापर आपण अत्यंत कमी खर्चात व सहजरित्या करू शकतो. सोशल मिडियाचा उपयोग करण्यासाठी शहराच्या मोठ्या ठिकाणी जाण्याची गरज नाही. ग्रामीण भागातही जागोजागी इंटरनेट कॅफेची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. साशल मिडियाचा वापर फक्त व्यक्ती-व्यक्तींमध्ये संवाद आणि संपर्क साधण्यासाठी होत नसून व्यवसाय करण्याचे ते एक महत्त्वपूर्ण साधन बनले आहे. जवळपास 70% व्यवसाय सोशल मिडियाद्वारे केले जात आहेत. कारण सोशल मिडियाद्वारे होणाऱ्या जाहिरातीतून व्यापारी किंवा उद्योगकर्ते सहजरित्या ग्राहकापर्यंत पोहचू शकतात.

आज तरुणांमध्ये 24 तास ऑनलाईन राहण्याची एक क्रेझ निर्माण झाली आहे. ऑफिसमधील पीसीपर्यंत मर्यादित असणारे इंटरनेट आता मोबाईलच्या माध्यमातून प्रत्येकाच्या खिश्यामध्ये उपलब्ध झाले आहे. भारतामध्ये मोबाईलवरून इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या झपाट्यने वाढत असून मार्च 2015 पर्यंत भारतातील 16 कोटी 65 लाख ग्राहक मोबाईलवरुन इंटरनेट वापरणार असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

सामाजिक संपर्क माध्यमांत सामाजिक बदलाची ताकद आहे पण त्याचा इतका दुरुपयोग होताना दिसत आहे की, काही साईट्सवर सरकारला बंदी घालावी लागली. आता तर सायबर गुन्हे आणि समाजकंटकाद्वारे अफवा आणि अशांतता पसरवण्यासाठी त्याचा वाढता वापर होत

आहे. आसाममध्ये झालेल्या हिंसाचारानंतर द्वेष आणि दहशत पसरवण्यासाठी पाकिस्तानातून इंटरनेटचा दुरूपयोग करण्यात आला. म्हणजेच युद्धातला सर्वात अत्याधुनिक मायावी प्रकार 'सायबर वार' आपल्या घरापर्यंत, शहरापर्यंत, पी.सी., लॅपटॉप, मोबाईलपर्यंत पोहोचला आहे असा त्याचा अर्थ होतो. युवक व विद्यार्थी वर्गाच्या समाज विकासाबाबत काही मुलभूत प्रश्न इंटरनेट, फेसबुक इ. माध्यमांद्वारे निर्माण झाले आहेत. अनेक विद्यार्थ्यांचा भर माहिती मिळवण्यावर असतो, शिकवण्यावर नाही असे दिसून येत आहे. त्याचा परिणाम त्यांच्या एकूण कार्यशैलीवर होऊन ही मुले परिणामकारक संवाद करण्यात मागे पडतात असे दिसून येत आहे. इंटरनेटच्या मदतीविना लिहिणे किंवा अचुक लिहिणे अनेक मुलांना जमत नाही. त्या माहितीचे मुल्यांकन व विश्लेषण करणे यात ते मागे पडले आहेत. माहिती व ज्ञान यातील फरक पुसट झाला आहे. या तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगातून युवक वर्गाला अंमली पदार्थाच्या व्यवसायात गुंतविण्याची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. अश्लिल संदेशाची देवाण-घेवाण व त्यातून निर्माण झालेली गुन्हेगारी स्वरुपाची गुंतवणूक ही चिंतेचा विषय बनली आहे. या सोशल मिडियाचे तरुण व्यसनी बनत चालली आहेत. एकलकोंडी बनत आहेत. खऱ्या सामाजिक संबंधापासून, खऱ्या सामाजिक संवादापासून दुरावली जात आहेत. त्यामुळे जग जवळ आले पण माणसे मात्र एकमेकांपासून दूर गेले. त्याचा कौटूंबीक नातेसंबंधावर परिणाम होत आहे. या सामाजिक एकलकोंडेपणाचा परिणाम शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत आहे. तरुण मुलांच्या आत्महत्या, वाढती हिंसक वृत्ती या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून ठळक होत चाललेली आणखी एक बाब म्हणजे इंटरनेट आणि राष्ट्र या दोन व्यवस्थांमधील वाढता तणाव आणि संघर्ष फेसबुक, ट्विटरसह इंटरनेटवरील अभिव्यक्ती आणि इतर व्यवहारांवर कसे नियंत्रण मिळवायचे त्याला राष्ट्रीय नियमांच्या चौकटीत कसे आणायचे, राष्ट्राबाहेरील शक्ती त्यांचा वापर करून गोंधळ माजवीत असल्या तर त्यांना कसे रोखायचे असे अनेक प्रश्न गेल्या वर्षभरात निर्माण झाले. गुगल आणि ट्विटरने देशनिहाय डोमेन करून राष्ट्राच्या चौकटीशी काही मेळ साधण्याचा प्रयत्न केला असला तरी इंटरनेटची व्यवस्था आणि राष्ट्र किंवा शासनव्यवस्था यांच्यातील तणाव इतक्या लवकर संपुष्टात येईल याची चिन्हे नाहीत. घटनेच्या अभिव्यक्तीच्या चौकटीत राहून सोशल मिडियावर कसा दबाव आणावा आणि त्यांच्या दुष्परिणामापासून वाचवण्यासाठी आपल्याभोवती तटबंदी कशी भक्कम करावी या प्रश्नांच्या उत्तरांमधून माध्यम साक्षरता निर्माण होऊ शकते. माध्यमांवर अधिकाधिक विसंबून राहत चाललेल्या आपल्या समाजासाठी ते निर्माण करणे अत्यंत गरजेचे आणि अनिवार्य आहे.

अभ्यास क्षेत्र (Study Area) :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र लातूर जिल्हा घेण्यात आलेले आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून सोशल मिडियाचा लातूर जिल्हयातील तरुण पिढीवर काय परिणाम घडून आलेला आहे हा या अभ्यासाचा विषय आहे. लातूर हे मराठवाड्यातील शैक्षणिक हब म्हणून गेल्या दोन दशकापासून पुढे आलेले आहे. लातूर जिल्हयाची निर्मिती उस्मानाबाद जिल्हयामधून 1982 ला झाली. लातूर जिल्हा हा भौगोलिक आकाराने राज्यात 16 व्या क्रमांकावर येतो तर

देशपातळीवर 181 वा क्रमांक येतो. लातूर जिल्हा हा कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्याच्या सीमेलगत आहे. 2011 च्या जनगणनेनुसार लातूरची लोकसंख्या 2454196 असून त्यात पुरुषांची लोकसंख्या 1273140 असून स्त्रियांची लोकसंख्या 1181056 इतकी आहे. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था मान्यता पावलेल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणातही जिल्ह्याचा नावलौकिक आहे. लातूरमध्ये उच्च शिक्षण देणारी अनेक महाविद्यालये आहेत. ऑक्सिट, राजर्षी शाहू कॉलेज, दयानंद कॉलेज, महात्मा बसवेश्वर कॉलेज, उदयगिरी कॉलेज, शिवाजी कॉलेज, बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज, महिला तंत्रनिकेतन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, लातूर विद्यापीठ उपकेंद्र, एमआयटी मेडिकल कॉलेज, लातूर जिल्हा 3 उपविभागात असून 10 तालुके मिळून बनलेला आहे. सदरील संशोधनाचा हेतू सफल व्हावा म्हणून सामाजिक संपर्क साधनांचा जिल्ह्यातील तरुणांवर काय परिणाम घडून आलेला आहे याचा अभ्यास होणार आहे.

विषय निवडीमागील भूमिका (Justification of Subject):

प्रस्तुत संशोधन विषय हा आजच्या तंत्रज्ञानाच्या व माहितीच्या युगात महत्त्वपूर्ण मानला गेलेला आहे. माहिती तंत्रज्ञान मानवी समाजावर व्यापक असा प्रभाव निर्माण करत आहे. विशेषत: समाजातील तरुण पिढी ही या तंत्रज्ञानाकडून सम्मोहित झालेली आहे. बदलत्या गरजा व तंत्रज्ञानाची उपलब्धता यांचा संबंध साहजिक आहे. तरुण पिढीवरील सामाजिक संपर्क साधनाचा प्रभाव हा दिवसेंदिवस वाढत आहे. या तंत्रज्ञानाच्या तरुण पिढीवर जे परिणाम घडून येत आहेत याचा अभ्यास करण्यासाठी हा संशोधन विषय मी निवडलेला आहे. विशेषत: हा अभ्यासविषय लातूर जिल्ह्यातील सामाजिक संपर्क माध्यमांचा तरुणांवरील झालेल्या परिणामाचा अभ्यास करणार आहे.

साहित्य पुनरावलोकन (Review of Literature):

कारा खान (2007) यांनी त्यांच्या एम.फिल. प्रबंधात 'Use of the internet and traditional media among young people' या अभ्यासात पारंपरिक व आधुनिक संपर्क साधनातील बदलाचा तरुणांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास केलेला आहे. David Backgham (2008) '*Youth identity*' या ग्रंथात डिजीटल मिडीयाचा कसा परिणाम झालेला आहे याचा अभ्यास केलेला आहे. आज डिजीटल मिडीयाने तरुणांचे संपूर्ण जीवन व्यापून टाकलेले आहे. नेहा अग्रवाल (2008) त्यांच्या 'Effects of Mass an Young Generation' या संशोधनाद्वारे सोशल मिडियाचा तरुण पिढीवरील नकारात्मक प्रभावाचा अभ्यास केलेला आहे. तरुण पिढी गुन्हेगारी जगताकडे वळायला लागलेली आहे.

Danial J. Planery (2009) '*Social Media* and its effects on youth' या पीएच.डी. प्रबंधात तरुणांचा इंटरनेट व सोशल मिडीयाच्या वापरात कसा सहभाग आहे हे संख्यात्मक आकडेवारीनुसार दाखवलेले आहे. हा अभ्यास अमेरिकेतील तरुण वर्गाशी संबंधीत आहे. तसे या अभ्यासात ज्यांनी तरुणाच्या वर्तनात झालेल्या बदलाचाही अभ्यास केलेला आहे. एलिन मायमर (2010) यांनी alive.com या वेबसाईटवर 'Teenagers and social media' या लेखात पुढील अभ्यास नोंदविलेला आहे. 1990 च्या दशकात सोशल मिडिया ही संकल्पना उदयास

आली व आजचा तरुण हा इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सान्निध्यात सर्वात जास्त वेळ घालवत आहे. ही ई-जनरेशन मोठ्या प्रमाणात शाळेतदेखील सेलफोन वापरत आहे. म्हणजेच ही पिढी कॉम्प्युटर सेव्ही बनलेली आहे.

सरिना गॉरईन (2011) यांनी त्यांच्या ‘Health Day’ या निबंधात मुलावर कसा परिणाम होत आहे याचा अभ्यास केलेला आहे. सोशल मिडीया हा आजच्या तरुणाचा जीवनाचा अविभाज्य अंग बनवलेला आहे. या अभ्यासात ती अशी म्हणते की, Facebook ही साईट कम्युनिटी बनवते पण तीच साईट वाईट कार्यासाठीसुद्धा तरुणांकडून वापरली जाते. उदा. Bulling, sexting इत्यादी.

डॉ.मारिया (2011) यांनी त्यांच्या ‘Media has the greatest impact of the young generation’ या निबंधात तरुणावरील सोशल मिडीयाचा परिणाम हा कुटुंब व शाळेपेक्षा जास्त परिणामकारक परिणाम करायला लागलेला आहे.

Socially Active.com या साईटवर ‘The effect of social media on teenagers’ या शिर्षकाखाली अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे. तो अभ्यास याचा निर्देश करतो की, लहान मुले आभास खेळ खेळत आहेत. तसेच मित्रांना चॅटिंगही करत आहेत. अमेरिकेतील 83% तरुण हे सोशल मिडियाचा वापर करून सचित्र व टेक्सट संदेश पाठवत आहेत. या मिडीयाचा नकारात्मक प्रभाव वाढण्याची तीन कारणे अभ्यासली आहेत. (1) पालकाचे दुर्लक्ष (2) पालकांना इच्छा नाही (3) पालक घाबरत आहेत. जेवेनन सुरजीन व कॅथलीन क्लार्क (2011) या दोन बालरोगतज्ञांनी किलनिकल रिपोर्ट अंतर्गत ‘The impact of social media an children adolescents and families’ तरुण मुले व सोशल मिडीया यांचा वापरावरील संशोधन लेख लिहिलेला आहे. त्यात ते म्हणतात की, मिडीयाच्या अतिवापरामुळे आरोग्यवर्धक वातावरण तयार होत नसून तरुणांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. त्यासोबतच सकारात्मक फायद्यापेक्षा नकारात्मक वापर व परिणाम वाढत चाललेला आहे. हे निदर्शनास आणून दिलेले आहे.

उपरोक्त उपलब्ध पुर्व संशोधन साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनास येते की, प्रस्तुत संशोधन विषय नवीन असल्यामुळे या विषयावर पुरेशा प्रमाणात अभ्यास न झाल्या कारणाने पुर्वसंशोधन साहित्य मर्यादित आहे. तरीपण उपलब्ध साधने व माझ्या वैयक्तिक मर्यादेच्या अधीन राहून विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न मी माझ्या संशोधनात करणार आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance):

प्रस्तुत संशोधन विषय हा माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीशी संबंधीत असून या क्रांतीचाच एक भाग म्हणून सामाजिक संपर्क माध्यमे ही इंटरनेट आधारित संपर्क पद्धती विकसीत झालेली आहे. या सोशल मिडीयामुळे आजचा तरुण पूर्णत: बदलत आहे. तो आता Technosavy झालेला आहे. या सामाजिक संपर्क माध्यमांद्वारे तो जगाशी कमी खर्चात, कमी वेळेत आपले म्हणणे जगातील कोणालाही सांगू शकत आहे. या सोशल मिडीयामुळे भौगोलिक व वेळेची मर्यादा कालबाहय झालेली आहे. येणारा काळ व आजचा तरुण हा आपले सर्व दैनंदिन कार्य

सोशल मिडीयाद्वारे पार पाडत आहे. भविष्यातील या साधनाचा उपयोग पहाता हे साधन निर्णायक भूमिका निभवणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation)

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही इंटरनेट बेस फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इंस्टाग्राम इत्यादी जी सामाजिक संपर्क साधने आहेत त्यांच्याशी संबंधित आहे. विशेषत: भारतातील जागतिकीकरण, उदारवादी पर्व आणि त्यानंतरचा बदललेला तरुण या अभ्यासाचा विषय आहे. प्रस्तुत संशोधनासाठी 2010-2020 हा काळ गृहीत धरलेला आहे. प्रस्तुत संशोधनाचे अभ्यासक्षेत्र लातूर जिल्हा असून लातूर जिल्हयातील तरुणांवर सामाजिक संपर्क माध्यमांच्या झालेल्या परिणामांचा अभ्यास अपेक्षित आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives) :

1) सामाजिक संपर्क माध्यमाच्या उदयाची कारणमिमांसा अभ्यासणे.
2) जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञान व सामाजिक संपर्क माध्यमाच्या संबंधाचा अभ्यास करणे.
3) लातूर जिल्हयातील सामाजिक संपर्क साधने व आजच्या तरुणावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
4) लातूर जिल्हयातील सामाजिक संपर्क साधने व तरुणावरील प्रभावाचा समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय प्रभाव अभ्यासणे.
5) सामाजिक संपर्क माध्यमांचा लातूर जिल्हयातील तरुणांवर झालेला सकारात्मक व नकारात्मक प्रभाव अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis) :

1) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे तरुणांना जगाशी संपर्क साधता येत आहे.
2) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे तरुणाचा बराच वेळ नेटवर जात आहे.
3) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे तरुण आभासी जगात वावरत आहे.
4) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे पारंपरिक नातेसंबंध, मैत्री या संकल्पनात परिवर्तन झालेले आहे.
5) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे गुन्हेगारी मानसिकता निर्माण होत आहे.
6) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे तरुण पिढीवर सकारात्मक व नकारात्मक प्रभाव पाडलेला आहे.
7) माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक संपर्क माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.
8) आभासी छेडछाडीचे प्रमाण वाढत आहे.

संशोधन पद्धती व तंत्रे (Research Methods and Techniques):

संशोधन आराखडा :

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व निदानात्मक संशोधन आराखडा (Dignosis Research Design) या दोन आराखड्याचा संयुक्तरीत्या वापरण्यात आलेला

आहे. पहिल्या आराखड्यातून समस्येचे ज्ञान करून घेतलेले आहे व दुसऱ्या आराखड्यातून गृहितकृत्याद्वारे समस्येवर अध्ययन करून निष्कर्ष काढलेले आहेत.

नमूना निवड (Sampling Method):

प्रस्तुत संशोधनासाठी नमूना निवडीतला गैर संभाव्य नमूना (Non-probability Sampling) निवड हा प्रकार निवडलेला आहे. त्यात सहेतूक नमुना पद्धत (Purposive Sampling Method) निर्धारित केलेली आहे. प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नमुना निवड ही लातूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील 2 महाविद्यालय, 2 कनिष्ठ महाविद्यालये व 2 प्राथमिक शाळांची निवड केली जाणार आहे. तसेच शाळा किंवा महाविद्यालयीन बाहय 200 तरुणाचा अभ्यास केला जाणार आहे. त्यात मूले व मुली असतील. या सर्वांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती-अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली जाईल. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधीत काही तज्ज्ञ व्यक्ति, संपर्क माध्यमाची साधने विकणारे दुकानदार, समितीतील शिक्षक व कुटुंबातील प्रमुख मंडळी विशेषत: आई-वडिल, सुरक्षा व्यवस्थेतील काही तज्ञाच्या मुलाखती घेऊन अभ्यास केला जाणार आहे.

तथ्य संकलन :

प्राथमिक स्त्रोत (Primary Source):

क्षेत्रिय शोध (Field Work) पद्धतीने माहिती मिळवली जाणार आहे. प्रत्यक्ष स्रोत पद्धती, मुलाखत (Interview), अनुसूची (Schedule) यांचा वापर करून काही तरुण व तज्ञांकडून माहिती संकलीत केली जाईल.

दुय्यम स्त्रोत (Secondary Source) :

प्राथमिक स्वरूपाच्या माहितीतील वस्तुनिष्ठता तपासून पाहण्यासाठी व प्राथमिक तथ्यांना वस्तुनिष्ठतेचा पुरावा देण्यासाठी म्हणून या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आलेला आहे.

दुय्यम स्त्रोतांचा एक भाग म्हणून सार्वजनिक प्रलेख (Public Document) तील प्रकाशित व अप्रकाशित साहित्य वापरले जाणार आहे. प्रकाशित साहित्यात विविध अहवाल, अंतरराष्ट्रीय अहवाल, आयोग, समिती, संशोधन संस्था अहवाल, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके व अप्रकाशित साहित्यात संशोधन अहवाल यांचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण (Data Analysis) :

तथ्यांचे विश्लेषण करणे हे संशोधनातील एक महत्त्वाचे कार्य आहे. म्हणून संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी पुढील पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. (1) तथ्यांचे संपादन (Editing of Data) (2) तथ्यांची छाननी (Scrutiny of Data) (3) तथ्यांचे वर्गीकरण (Classification of Data) (4) संकेतीकरण (Codification) (5) सारणीकरण (Tabulation of Data)

साहित्य संदर्भ पद्धत (Method of Reference):

संशोधनास संदर्भ देण्यासाठी पुढील पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन प्रबंधात सामाजिक शास्त्रासाठीच्या जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या APA

(American Psychological Association) च्या पाचव्या व सहाव्या आवृत्तीच्या (नाव आणि वर्ष पद्धत) मार्गदर्शक सूचनांचा वापर करण्यात आलेला आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले

माहिती तंत्रज्ञानाच्या उदयाची पार्श्वभूमी

माहिती तंत्रज्ञान ही संकल्पना काम्प्युटरशी संबंधीत समजली जाते. कॉम्प्युटरच्या उदयाबरोबरच माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची वाटचाल सुरू झाली. विशेषत: या क्षेत्राची सुरुवातही दुसऱ्या महायुद्धानंतर झालेली आहे. या काळात लष्कर व लष्करी सामग्री उद्योग आणि युद्धकाळातील संपर्क यातून माहिती तंत्रज्ञान क्षेत्र उदयास आलेले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात टेलिफोन, कॉम्प्युटर, इंटरनेट इ. इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर होतो. वरील साधनांद्वारे जेव्हा माहितीचे आदान-प्रदान होते तेव्हा त्यास माहिती तंत्रज्ञान असे म्हणतात. 1980 पासून अभ्यासक्रमाच्या पातळीवर संशोधकाकडून ICT हा शब्दप्रयोग वापरण्यास सुरुवात झाली. आज टेलिफोन, इंटरनेट व कॉम्प्युटर नेटवर्क माध्यमातून या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. आज माहिती तंत्रज्ञानाचा वापर इतका वाढलेला आहे की आजचे युग हे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून संबोधले जात आहे. या माहिती तंत्रज्ञानाचा प्रगत आविष्कार म्हणून इंटरनेट नेटवर्कींग अंतर्गत सोशल मीडिया (फेसबुक, ट्विटर, ब्लॉग, चॅटिंग, ई-मेल) चा वापर वाढलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राच्या उदयाची माहिती अभ्यासली जाणार आहे.

प्रकरण दुसरे

सामाजिक संपर्क माध्यमे: अर्थ, व्याप्ती व स्वरूप

सामाजिक संपर्क माध्यमे म्हणजे माहिती व संकल्पना (विचार) यांची निर्मिती, देवघेव व आदान-प्रदान लोकांत होणे किंवा घडणे होय. अड्रीज कप्लान यांच्या मते, सामाजिक संपर्कसाधने म्हणजे इंटरनेट बेस साधन ज्याद्वारे ते एक प्रकारचे वैचारिक व तांत्रिक संघटन होय. व्यक्ति आपला बहुतेक वेळ हा इतर साईटपेक्षा सोशल साईटवर खर्च करतो. सामाजिक संपर्क माध्यमांमुळे माहितीचे आदान-प्रदान हे वैयक्तिक, समुह, संघटनात्मक पातळीवर केले जाते. सोशल मीडियात इंटरनेट, वेब ब्लॉग, सामाजिक ब्लॉग्ज, यू-ट्युब इ. समावेश होतो. सोशल मीडियाची व्याप्ती आता जगभर झालेली आहे. आज कोणताही असा देश नाही जिथे सोशल मीडिया नाही. सामाजिक संपर्क माध्यमांचे रूप दिवसेंदिवस बदलत चालले आहे. नव-नवीन तंत्रज्ञानाची व ॲपसची भर पडत आहे. समाजातील विशेषत: तरूण वर्ग हा सोशल मीडियाच्या जाळ्यात ओढला जात आहे. प्रस्तुत प्रकरणात सामाजिक संपर्क माध्यमांचा अर्थ, व्याप्ती व स्वरुप याबाबत सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे

सामाजिक संपर्क माध्यमे व आजचा समाज

21 व्या शतकातील समाज हा 'Technosavy' तंत्रज्ञानाधिष्ठित समाज बनलेला आहे. जगातील प्रत्येक जण हा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात, प्रकारे तंत्रज्ञानाचा वापर करत आहे.

माहिती तंत्रज्ञान हा जनतेचा अविभाज्य भाग बनलेला आहे. विशेषत: माहिती तंत्रज्ञान किंवा सामाजिक संपर्क माध्यमांचा सर्वात जास्त परिणाम हा तरुण वर्गावर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येत आहे. तरुण आपल्या मनातील विचार, भावना, संकल्पना इंटरनेट माध्यमाद्वारे अभिव्यक्त करू लागलेला आहे. हे माध्यम कमी खर्चिक, वापरण्यास सोपे व कमी वेळात संपूर्ण जगभर पसरणारे असल्यामुळे त्याचे आकर्षण वाढलेले आहे. पारंपरिक संपर्क साधनांना भौगोलिक व काळाच्या मर्यादा पडत होत्या. पण या नवीन साधनांद्वारे संपूर्ण जग एकमेकाला जोडले जाण्याची प्रक्रिया होत आहे. जग हे आता सपाट बनलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात सामाजिक संपर्क माध्यमांचा आजच्या मानवी जीवनावर कसा प्रभाव निर्माण केलेला आहे. याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

सामाजिक संपर्क माध्यमे व आजचा तरुण

सामाजिक संपर्क माध्यमे आणि तरुण हे समीकरण आता घट्ट झालेले आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे इंटरनेट बेस अनेक साधने अभिव्यक्त होण्यासाठी पुढे आलेली आहेत. विशेषत: कम्युनिटी साईट्स म्हणजेच सोशल मिडीया होय. या कम्युनिटी साईट्स किंवा सोशल नेटवर्कींगचा सर्वात जास्त प्रभाव समाजातील तरुणांवर पडत आहे. विशेषत: वय 15 ते 35 या गटाती तरुण वर्ग हा सर्वात जास्त वापरकर्ता ठरलेला आहे. प्रत्येकजण आज इंटरनेटद्वारे आपले दैनंदिन कार्य, करमणुकप्रधान मनोरंजन व इतर दृक-श्राव्य साधने वापरत आहे. विचाराची व संकल्पनांची देवाण-घेवाण तो कमी वेळात, कमी खर्चात संपूर्ण जगभर करत आहे. आज बाजारात वेगवेगळ्या कंपन्या नव-नवीन ॲप्स बाजारात आणत आहेत. विशेषत: मोबाईल कंपन्या स्मार्ट फोन (5th जनरेशन) बनवत आहेत. त्यामुळे मोबाईलवरील सामाजिक संपर्क माध्यमांचा वापर वाढलेला आहे. पुर्वीच्या पिढीच्या तुलनेत आजची पिढी निश्चितच तंत्रज्ञानाच्या बाबतीत संवेदनशील झालेली आहे.

प्रकरण पाचवे

सामाजिक संपर्क माध्यमांचा लातूर जिल्ह्यातील तरुणांवरील प्रभाव / परिणाम / फायदे / तोटे

प्रस्तुत प्रकरण हे या संशोधन विषयातील प्रमुख असून या प्रकरणात पुढील बाबींवर ऊहापोह होणार आहे. सामाजिक संपर्क माध्यमांचा वाढता वापर हा तरुणांवर सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही अंगाने परिणाम घडवून आणणार आहे. सकारात्मक दृष्टीकोनातून जर आपण या सोशल मिडिया व तरुण याकडे पाहिले असता पुढील प्रभाव जाणवू शकतात. (1) आजचा तरुण बदलत आहे. (2) तरुणांना जलद संपर्क साधने उपलब्ध झालेली आहेत. (3) सोशल मिडियामुळे तो कमी वेळेत, कमी खर्चात व जगभर संपर्क साधू शकत आहे. (4) जगातील कानाकोपऱ्यात त्याला मैत्री प्रस्थापित करता येत आहे. (5) तरुण हा आपल्या भाषा, विचार, भावना व कल्पना एकमेकास आदान-प्रदान करत आहेत. (6) सामाजिक संपर्क माध्यमांमुळे संकुचित स्थानिक अस्मिता नष्ट होत आहेत. इ. बदल जाणवत आहेत. या सोशल मिडियामुळे काही नकारात्मक बदल घडत आहेत. (1) तरुण हा एकलकोंडा व व्यसनाधीन (तंत्रज्ञानाचे) बनत चाललेला आहे. (2) तो वास्तविक जगापेक्षा आभासी जगात वावरत आहे.

(3) अतिवापरामुळे मानसिक व शारीरिक समस्या निर्माण होत आहेत. (4) तो त्याच्या वैचारिक पद्धतीने अभिव्यक्त होत नाही. (5) या माध्यमांद्वारे चारित्र्यहनन, सायबर गुन्हेगारी इ. अपप्रवृत्ती निर्माण होत आहेत. इ. वरील नकारात्मक दोष निर्माण होत आहे.

प्रकरण सहावे

उपयुक्त शिफारशी व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासाअंती आलेल्या अनुभवावरुन काही उपयुक्त शिफारशी मांडल्या जाणार आहेत. तसेच काही निष्कर्षही मांडले जाणार आहेत.

परिशिष्ट्ये

- सामाजिक संपर्क माध्यमांची सचित्र माहिती
- सामाजिक संपर्क माध्यमांचा आलेखाद्वारे संख्यात्मक माहितीपट
- प्रश्नावली नमूना
- काही इंग्रजी संज्ञाचे स्पष्टीकरण

संदर्भ ग्रंथ सूची :

1) James Younless Miranda Yates (1997) '*Community Services and Social Responsibility in Youth*' University of Chicago Press.
2) Bill Osgerby (2004) '*Youth Media*' MIT Press.
3) Sharon R. Mazzarella (2007) '*20 questions about youth & the media*', Peterlan publication.
4) David Buckingham (2008) '*Youth, Identity and Digital Media*', MIT Press
5) Marn'am J. Metzger. Andrew J. Flanagin (2008) '*Digital Media, Youth and credibility*' MIT press.
6) Sahaheen Sharif (2008) *'Cyber Bullying : Issues and Solution for the social, the classroom'* MIT Press.
7) David Bacihum (2008) '*Youth identity and digital media*'
8) Sonia Livingstone (2009) *'children and Internet'*
9) Lee Simon (2010) : '*Social Media Dangers : Get informed protect your child*'
10) Chau C. (2010) *'You Tube as a participation culture'* Wiley Periodicals 128
11) Todd Kelsey (2010) '*Social Networking spaces from facebook to twiffen and everything*'.
12) Jefferey R. Walker (2011) '*The Social Media revolution : Social Medias Impact on Youth*', Niagara University.
13) Hana S. Noor, Al Deen John Allex Hendricks. (2011) '*Social Media : Usage and Impact*'
14) Daniel Miller (2011) '*Tales from facebook*' Polity Publication.

15) Ainaya Wang (Nov. 2011) *'The effect of social media on college students'* Ph.D. Thesis Johnson & Wales University.

16) Carroll J.A. & Kirkpatrick (2011) '*Impact of Social Media and adolescent behavioural health.*' Okland CA California.

23) Clarke Pearson K.O. Keefee G. (2011) *'The impact of social media on children'* Abolescent and families.

24) http://www.courierpress.com/news/2011 *'Research confirms social medias impact on adolescent development'*

25) Rosen L.D. (2011) *'Social Networking good and bad impacts on kids'* Retrived from http://sites.eww.edu/cmst.

26) Barry Checkoway (2012) *'Youth Participation and Community Change'*

27) (Bloggies) 27 Jan. (2012) Research Essay Paper on the impact of social media on the youth www.singalwriting.com retrived from Feb.2013

28) Lilas N. Gawhry (2012) *'Assessing the impact of social media on the Egyptian Revolution'* Monterly. California.

29) Serena Cardon (28-2012) *'Social media has good and bad effects on kids : Exports'* Retrived from http://healthuse news.com.

30) Dr.Larry Rosen (2013) '*Poke me how social network canboth and Harm out kids*' American Psychological Association 119th Convention.

31) http://www.practicalparticipation.co. UK retrived f rom 2013, 19 Feb.

32) Angela Barnes & Christine Laird *'The effect of social Media and children'*.

33) http://blog.widomjobs.com *'Social media and its impact on youth'* Retrived from Feb.2013.

<u>मराठी ग्रंथ</u>

1) कोण्णूर, सुजाता '*माहिती तंत्रज्ञान शब्दकोश*', डायमंड प्रकाशन

2) शिकासुर दिपक, मराठे उज्वल, 'आधुनिक *माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात*' उत्कर्ष प्रकाशन, पृ.142.

3) कुकडे अतुल, '*माहिती तंत्रज्ञान*' विजयश्री प्रकाशन

4) कोण्णुर, सुजाता '*माहिती तंत्रज्ञान*' डायमंड पब्लिकेशन्स

5) गोडबोले अच्यूत, '*संगणक युग*' मौज प्रकाशन, मुंबई

6) कोण्णुर सुजाता, कोण्णुस अनुप, कोण्णुर मेखला '*माहिती तंत्रज्ञान संपूर्ण ओळख*' डायमंड प्रकाशन, पुणे.

7) टिमोशी, ओलीटी, '*ओळख माहिती तंत्रज्ञानाची*' टाटा मॅकग्रा हिल एज्युकेशन प्रकाशन

8) आपटे मोहन, '*इंटरनेट एक कल्पवृक्ष*' राजहंस प्रकाशन, पुणे

9) धारूकर व्हि.एल. (2006) '*´माहिती आणि प्रसारमाध्यमे*' किर्तने प्रकाशन, औरंगाबाद

10) कहाते, अतुल (मे 2012) '*यांनी जग बदललं गुगल*' मनोविकास प्रकाशन, पुणे
11) कहाते, अतुल (मे 2012) '*यांनी जग बदललं फेसबुक*' मनोविकास प्रकाशन, पुणे
12) कहाते, अतुल '*आयटीत जायचंय*' राजहंस प्रकाशन

<u>नियतकालिके</u>

1) जाधव, बबन (नोव्हेंबर 2010) '*इंटरनेट सेवा व उपयोग योजना* (विकास समर्पित मासिक), नवी मुंबई.
2) राऊत, श्रीकृष्ण. (नोव्हेंबर 2010) '*माहिती तंत्रज्ञानाचा नवा चेहरा : ब्लॉग संस्कृती*' योजना, (विकास समर्पित मासिक), नवी मुंबई.
3) मनोहर, दिनानाथ (जुन 2011) '*सोशल मीडियाची भूमिका*' परिवर्तनाचा वाटसरू, पुणे.
4) घोष, सागरिका (नोव्हे. 2011) '*व्हर्च्युअल भूलभुलैय्या*' (उद्याचे पत्रकार) अक्षर दिवाळी अंक, मुंबई
5) गोडबोले, अच्युत (नोव्हे. 2011) '*मध्यमवर्गीयांची चळवळ*' अक्षर दिवाळी अंक, मुंबई
6) दाते, कुलदीप (नोव्हें. 2011) '*व्हर्च्युअल* जगण्यामागच *मानसशास्त्र*' अक्षर दिवाळी अंक, मुंबई.
7) मतकरी, गणेश (नोव्हे. 2011) '*नव्या पिढीचा ट्विस्ट*' अक्षर दिवाळी अंक, मुंबई.
8) भोळे, भास्कर (जुलै/सप्टेंबर 2012) '*भारतीय लोकसत्तेला तंत्रसत्तेचे आव्हान*', समाजप्रबोधन पत्रिका

<u>वर्तमानपत्रे</u>

1) भापकर, अनिल (8 जुलै 2012) '*सावधान ! तुमची मुले फेसबुक वापरताहेत?*' दै.लोकमत.
2) ढोले, विश्राम (14 डिसेंबर 2012) '*साहेब, मीडिया आणि आपण*' दै.लोकसत्ता
3) पाध्ये अद्वैत (15 डिसेंबर 2012) '*इंटरनेट व्यसनाचे बळी* दै.लोकसत्ता
4) दीक्षित, प्रशांत (18 डिसेंबर 2012) '*कॉपीबहाद्दर*' दै.लोकसत्ता
5) घोडेस्वार, प्रविण (24 डिसेंबर 2012) '*माहिती साक्षर व्हा !* दै.सकाळ करिअर मंत्र
6) ढोले, विश्राम (28 डिसेंबर 2012) '*प्रसारभान-प्रक्रिया थांबणार नाही* दै.लोकसत्ता
7) बोराडे, योगेश (5 जानेवारी 2013) '*यू-टयुब देणार विद्यार्थ्यांना धडे*' दै.लोकसत्ता
8) जेवळीकर, सुहास (20 जानेवारी 2013) '*माहिती ज्ञान शहाणीव वगैरे*' महाराष्ट्र टाईम्स

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुरेखा वैजनाथ दाडगे
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर
महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधक
आकांक्षा भूषण कांबळे
एम.ए., सेट, नेट (समाजशास्त्र)